मी फार भाग्यवान आहे. ललित कला साधना, कलावैभव, गोवा हिंदु असोसिएशन, इंडियन नॅशनल थिएटर, ललितकलादर्श, कलारंग, नाट्यमंदार, नाट्यसंपदा, चंद्रलेखा, श्रीचिंतामणी यासारख्या मातबर संस्थांनी माझी नाटकं रंगभूमीवर आणली. नंदकुमार रावते, कमलाकर सारंग, पुरुषोत्तम दारव्हेकर, मो. ग. रांगणेकर, सतीश दुभाषी, कमलाकर सोनटक्के, अशोक साठे, राजन ताम्हणे, कुमार सोहनी, विनय आपटे यांच्यासारख्या प्रतिभावान दिग्दर्शकांनी ती दिग्दर्शित केली. मामा पेंडसे, मा. दत्ताराम, भालचंद्र पेंढारकर, शरद तळवलकर, डॉ. श्रीराम लागू, दत्ता भट, आत्माराम भेंडे, सतीश दुभाषी, विक्रम गोखले, यशवंत दत्त, अरुण जोगळेकर, दिलीप प्रभावळकर, श्रीकांत मोघे, प्रदीप वेलणकर, रमेश भाटकर, दिलीप कुळकर्णी, विनय आपटे, जयराम हर्डीकर यांसारख्या अभिनेत्यांनी आणि भावना, विजया मेहता, शांताबाई जोग, आशालता, आशा पोतदार, भक्ती बर्वे, लालन सारंग, रीमा, नीना कुळकर्णी, भारती आचरेकर, स्मिता तळवलकर, सविता प्रभुणे, सुहास जोशी, स्वाती चिटणीस, मनोरमा वागळे, सुकन्या कुळकर्णी, इला भाटे यांच्यासारख्या अभिनेत्रींनी माझे वेडेवाकुडे शब्द आपल्या हृदयापर्यंत पोहोचवले, माझ्या निर्जीव शब्दांना आत्मा, रंग, रुप, आकार दिला. एका कालखंडातील सर्वोत्कृष्ट कलावंत माझ्या नाटकांना मिळाले. असं भाग्य किती जणांच्या वाट्याला येतं? या सर्व कलावंतांशी मी कृतज्ञ आहे. ही नामावळी ऐकल्यावर आपल्या लक्षात आलं असेल की आज ज्या स्थानावर मी येऊन पोहोचलो आहे, जे यश, जो सन्मान, जी लोकप्रियता मला मिळाली त्यात माझ्या कर्तृत्वाचा भाग किती थोडा आहे.

रसिकहो, १८४३ साली विष्णुदास भाव्यांपासून सुरु झालेली मराठी रंगभूमी अनेक वळणं घेत, अनेक चढउतार पहात आज या टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. या रंगभूमीने जसे वैभवाचे दिवस पाहिले तशीच हलाखीची परिस्थितीही काढली. एक काळ असा होता की ही रंगभूमी जगते की मरते अशी स्थिती होती. अनेक लाटा आल्या आणि गेल्या. पण मराठी नाटक गुदमरलं नाही. कोमेजलं नाही. सर्व वादळांना तोंड देत, सारी आक्रमणं थोपवत मराठी रंगभूमी फुलतच राहिली. हा चैतन्याचा झरा कधी आटला नाही, कधी आटणार नाही. मराठी नाटक ज्या पूर्वसुरीनी रुजवलं, जोपासलं, वाढवलं त्यांचं योगदान केवळ अतुलनीय आहे. त्यात किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी, वरेरकर, अत्रे, रांगणेकरांसारखे नाटककार, बालगंधर्व, मा. दिनानाथ, केशवराव भोसले, बापुराव पेंढारकर यांच्यासारखे गायक नट, गणपतराव जोशी, चिंतामणराव कोल्हटकर, केशवराव दाते, नानासाहेब फाटक,